01 C

५

# महाराष्ट्र शासन
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया

कुंवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय परिसर, नेहरु चौक, गोंदिया, महाराष्ट्र

फोन नं. ०७१८२-२३८०९० ई मेल :gmcgondiya@gmail.com

जा.क्र.शावैमगों/कंत्राटी/सहा.प्राध्या/जाहिरात ३६४/ 8997 /२०२४ दि. 24 /०७/२०२४

अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा.संचालक,
माहिती व जनसंपर्क, संचालनालय,
विभागीय आयुक्त कार्यालय इमारत,
सिव्हील लाईन,
नागपूर.- ४४०००१.

विषय : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक तसेच प्राध्यापक (दंतशास्त्र) यांचे पदे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत....

मा.महोदय,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक तसेच प्राध्यापक (दंतशास्त्र) यांचे पदे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत या पत्रासोबत जोडण्यात येत असलेली जाहिरात सूचना जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमान पत्रांमध्ये कमीत कमी आकारामध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयाचे नाव दुरध्वनी व ई-मेल पत्ता | संस्थेचे नाव :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया<br>दुरध्वनी क्रमरंक :- ०७१८२-२३८०९०, २३८०९८<br>ई-मेल :- gmcgondiya@gmail.com |
| ०२ | जाहिरातीची सुचना प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दिनांक २९.०७.२०२४ |
| ०३ | प्रसिध्दीचे स्वरुप | विदर्भ स्तरावर |
| ०४ | प्रसिध्दीकरीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या विदर्भ स्तरीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये |
| ०५ | किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे | एक वेळ |
| ०६ | देयक प्रदान करण्याकरीता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया |

सहपत्र- जाहीर सुचनेचा मसुदा

25/7/2024
आवक विभाग
संचालक, माहिती व जनसंपर्क कार्यालय
महाराष्ट्र शासन
जुने सचिवालय १ ला माळा,
नागपूर-४४० ००१

(डॉ. कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोंदिया

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र शासन**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया**

**कुंवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय परिसर, नेहरु चौक, गोंदिया, महाराष्ट्र**

ई मेल :gmcgondiya@gmail.com

फोन नं. ०७१८२-२३८०९०


जा.क्र.शावैमगों/कंत्राटी/प्राध्या/सह.प्रा./जाहिरात३६४/8997 /२०२४ दि. 24/०७/२०२४

## जाहिरातीची सूचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व रुग्णसेवा लक्षात घेता (चिकित्सालयीन) खालील प्रमाणे विषयातील रिक्त असलेले **प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक** पदे शासनाचे अटी व शर्ती नुसार निव्वळ तात्पुरत्या करार तत्वावर ३६४ दिवसाकरिता भरण्यात येत आहे. तसेच जाहिराती संबंधी विस्तृत माहिती व अर्जाचा नमुना दिनांक :-२९.०७.२०२४ ते दि.०९.०८.२०२४ पर्यंत या संस्थेच्या www.gmcgondya.in व www.med-edu.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

**प्राध्यापकाचे भरावयाचे रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत**.

(१) औषधवैद्यकशास्त्र (२) त्वचा व गुप्तरोगशास्त्र (३) मनोविकृतीशास्त्र (४) नेत्रशल्यचिकित्साशास्त्र (५) क्षयरोगशास्त्र (६) क्ष-किरणशास्त्र (७) बधिरीकरणशास्त्र (८) शल्यचिकित्साशास्त्र (९) दंतशास्त्र

**सहयोगी प्राध्यापकाचे भरावयाचे रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत**.

(१) औषधवैद्यकशास्त्र (२) बालरोगचिकित्साशास्त्र (३) शल्यचिकित्साशास्त्र (४) क्ष-किरणशास्त्र

वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे दिनांक १८ जानेवारी २०२४ मधील अटी व शर्तीनुसार या संस्थेतील रिक्त असलेले **प्राध्यापक (दंतशास्त्र)** पद भरण्यात येईल

(डॉ. कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोंदिया

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया
कुंवर तिलकसिंह सामान्य रुग्णालय परिसर, नेहरु चौक, गोंदिया, महाराष्ट्र

फोन नं. ०७१८२-२३८०९० ई मेल :gmcgondiya@gmail.com


जा.क्र.शावैमगों/कंत्राटी/प्राध्या/सह.प्रा./जाहिरात३६४/8997/२०२४ दि.24/०७/२०२४

# जाहिरात

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे पदे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत.

संदर्भ :- १. वै.शि.व औ.द्र.,विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३, दि.०९.०२.२०२२

२. आयुक्त,वै.शि.व सं,मुंबई यांचे पत्र क्रं.संवैशिवसंमु/जाहिरात/करार/क१/२५९३/२०२३,दि.२५.०८.२३

३. वै.शि.व औ.द्र.,विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्रं.एलईडी -२०२२/प्र.क्र.२२९/शिक्षण-१, दि.१४.०७.२०२३

संदर्भीय क्रं. १ ते ३ च्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथील विद्यार्थी व रुग्णहीत लक्षात घेता रिक्त असलेले **प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक** यांचे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता अटी व शर्तीच्या अधीन राहून पदे भरण्याबाबतची जाहिरात देण्यात येत असून सदर जाहिरातीचे विवरण खालील प्रमाणे आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदीया

प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची रिक्त पदे दर्शविणारा तक्ता (करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता)

**पदाचे नाव:- प्राध्यापक**

| अ. क्र. | विषयाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | M.D.(General Medicine)/DNB (General Medicine) | As per notification14-02-2022<br>I) Associate Professor in the subject for 3 years in a permitted/Approved/ recognized medical colleg/institution.<br>II) Should have atleast four Research Publications (atleast two as Associate Professor) (only original papers,meta-analisis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DoAJ) will be considered), The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | M.D.(Dermatology & Venereology) /M.D. (Dermatology, Venereology & Leprosy)/ M.D. (Dermatology)/ M.D.(Dematology including Venereology)/ M.D. (Dermatology including Venereology/ Leprosy)/ M.D. (Medicine with D.V.D. OR D.D.)DNB (Dermatology and Venereology) | |
| ३ | मनोविकृतीशास्त्र | ०१ | M.D. (Psychiatry)/ M.D. (Psychological Medicine)/ M.D.(Medicine with Deploma in Psychological Medicine)/ DNB (Psychiatry) | |
| ४ | नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | M.S.(Ophthalmology) / DNB (Ophthalmology) | |
| ५ | क्षयरोगशास्त्र | ०१ | M.D.(Respiratory Medicine) / DNB (Respiratory Medicine) | |
| ६ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | M.D. (Radio-Diagnosis) / M.D.(Radiology) / DNB (Radio-Diagnosis)/ (Radiology) | |
| ७ | बधिरीकरणशास्त्र | ०१ | M.D. (Anestesiology) / DNB (Anestesiology) | |
| ८ | शल्यचिकित्साशास्त्र | ०१ | M.S. (General Surgery) / DNB (General Surgery) | |
| ९ | दंतशास्त्र | ०१ | A Bachelors Degree in Dental Surgery from and Indian Univercity with Masters in Dental Surgery or Diplomat of National Bords recognized by the Government of India on the recommendation of council in the concerned subject. | Experience of teaching the concerned subject as an Associate Professor in recognized Dental College for not less than five years. |
| | एकूण | ०९ | | |

..२..

Scanned with CamScanner

**पदाचे नावः- सहयोगी प्राध्यापक**

| अ.क्र. | विषयाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ०२ | M.D.(General Medicine) / DNB (General Medicine) | As per notification14-02-2022<br>I) Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/Approved/ recognized medical college/institutiona.<br>II) Should have atleast two Research Publications (only original papers,meta-analisis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DoAJ) will be considered), The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | बालरोगचिकीत्साशास्त्र | ०१ | M.D.(Paediatrics) / DNB (Paediatrics) | |
| ३ | शल्यचिकीत्साशास्त्र | ०२ | M.S. (General Surgery) / DNB (General Surgery) | |
| ४ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | M.D. (Radio-Diagnosis) M.D. (Rediology) / DNB (Rediology) | |
| | एकूण | ०६ | | |

टिप : सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णतः रदद करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१. या संस्थेच्या www.gmcgondya.in व www.med-edu.in संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच अर्ज उपलब्ध आहे.
२. अर्ज उपलब्ध :- **दि. २९/०७/२०२४**
३. अर्जाचे शुल्क :- रु. १००/-
४. अर्ज सादर करण्याचा शेवटचा :- **दि. ०९/०८/२०२४ (सायंकाळ ०४.०० पर्यंत )**
५. मुलाखतीचा दिनांक व वेळ. :- दुरध्वनी व्दारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी.
६. मुलाखतीचे ठिकाण :- अधिष्ठाता यांचे कार्यालय शा.वै.म.,गोंदिया.(के.टी.एस.रुग्णालय,परिसर)
७. शासकीस सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयात सादर करावे. मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करावे.
८. मुलाखती करिता उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचे दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
९. उमेदवारांने कुठलाही प्रकारे शिफारस पत्र जोडू नये किंवा इतर माध्यमातून शिफारस केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**महत्वाची टिप :**

१) उमेदवार हा भारताचा नागरीक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
२) उमेदवाराचे वय : नियुक्तीच्या वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे
३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.
४) मानधन :

| पदनाम | नियुक्तीची संस्था | मानधन |
|---|---|---|
| प्राध्यापक | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया | सेवानिवृत्त अध्यापकांस शासन नियमानुसार तसेच बिगर सेवानिवृत्त प्राध्यापकांस रु.२,००,०००/- (दोन लक्ष केवळ) (एकत्रीत सर्व भ-त्यासहीत) |
| प्राध्यापक (दंतशास्त्र) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया | सेवानिवृत्त अध्यापकांस शासन नियमानुसार तसेच बिगर सेवानिवृत्त प्राध्यापकांस रु.१,२०,०००/- (एक लक्ष विस हजार केवळ) |
| सहयोगी प्राध्यापक | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया | सेवानिवृत्त अध्यापकांस शासन नियमानुसार तसेच बिगर सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापकांस रु.१,८५,०००/- (एक लक्ष पंचाऐंशी हजार केवळ) (एकत्रीत सर्व भ-त्यासहीत) |

५) **गुणांकन पध्दत** : जाहिरातीसोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.
(१) परिशिष्ट अ मध्ये नमुद अ.क्र.१ ते ४ वरील एकूण ८५ गुणांच्या आधारे तातपुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.
(२)प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांपैकी किमान ४१ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविण्या-या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरिता विचार केला जाईल.



Scanned with CamScanner

**नियम व अटी :**

१) करार पध्दतीने नियुक्ती कालावधी हा नियमीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध्द झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील

२) उमेदवाराचे कामकाज समाधारनकारण नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्ठात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनूसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यावसाय करण्याची मुभा राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणत्याही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्यांच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती आधरसामुग्रीबाबत गोपनीय पाळणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपतपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल,असे शपथपत्र सादर करण्या-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षण्कि सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्यांला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११) अर्जदाराने संबंधित पदसाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहिराती मधील नमुद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णत: रदद करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल)

१७) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी (Online) ऑन लाईन सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ.कुसुमाकर घोरपडे)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गोंदिया

प्रत,

१. मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१

प्रतिलिपी,

१) रोखपाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया
२) सुचना फलक,शावैम,गोंदिया, ३) सुचना फलक, ग्रंथालय विभाग,शावैम,गोंदिया

Scanned with CamScanner